औरंगाबाद गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाची शुक्रवार दि. १८. ३. ९४ रोजी झालेल्या ९० व्या सभेचा कार्यवृत्तांत.

=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=- - - =

बैठकीस खालील पदाधिकारी उपस्थित होते.

---

| | |
|---|---|
| १] श्री. ईश्वरराव भोसीकर | सभापती औरंगाबाद मंडळ |
| २] श्री. भास्कर मुंढे | उपसभापती औरंगाबाद मंडळ. |
| ३] श्री. गोविंद गारे<br>आयुक्त म. न. पा. औरंगाबाद. | सदस्य. |
| ४] श्री. द्वै. हि. मुन,<br>उपसंचालक, नगररचना विभाग,<br>औरंगाबाद. | सदस्य |
| ५] श्री. [illegible] देशपांडे<br>उर्फ [illegible] पारटाणाकर | सदस्य |

विषय क्र. १: दि. ४. १. ९४ रोजी झालेल्या ८९ व्या बैठकीचा कार्यवृत्तांत कायम करणेबाबत.

दिनांक ४. १. ९४ रोजीच्या मंडळाच्या बैठकीत घेतलेल्या निर्णयावर सविस्तर चर्चा होऊन मंडळाने असा निर्णय घेतला की,

<u>ठराव क्र. ५३९</u>

दिनांक ४. १. ९४ रोजीझालेल्या ८९ व्या बैठकीच्या कार्यवृत्तांतवर सविस्तर चर्चा होऊन सदरचा कार्यवृत्तांत कायम करण्यांत आला.

विषय क्र. २: कौठा नांदेड येथील सर्व्हे क्र. ८० वर गृहनिर्माण योजना राबविणेबाबत.

या विषयाची बाब टिप्पणी उपसभापतींनी मंडळास वाचुन दाखविली व कौठा नांदेड येथील सर्व्हे क्र. ८० वरील योजनेबाबतची थोडक्यात माहिती दिली. या जमिनीवर राबविण्यात येणाऱ्या

मध्यम उत्पन्न गटातील ११९ गाळ्यासाठी जाहिरात देण्यांत आली होती. परंतु त्यास फारच कमी प्रतिसाद मिळाला. याबाबतीमध्ये आता परत मंडळातर्फे पुर्वी प्रस्तावीत अल्प उत्पन्न गटा अंतर्गत गाळ्यांच्या नकाशात व आराखडयात फेरबदल करून जोडघरे ऐवजी बैठे चाळीतील गाळे व गाळ्यांचे भूखंड क्षेत्रफळ ६०.०० चौ.मी. ऐवजी ४०.०० चौ.मी. करून सुधारीत योजना तयार करण्यांत येत आहे व योजनेचे आराखडे नकाशे व अंदाजपत्रके तयार झाल्यानंतर मागणी अंदाज आजमाविण्यांत येईल असे उपसभापतींनी सांगितले.

यावर मा. सभापतींनी सांगितले की, याबदलानुसार प्रथम मागणी अंदाज आजमावण्यासाठी जाहिरात देण्यांत यावी व नंतरच पुढील कार्यवाही करावी.

चर्चेअंती मंडळाने असा निर्णय घेतला की,

ठराव क्र. ५४०
------------

कौठा नांदेड येथील सर्वे क्र.८० या जमिनीवरील प्रस्तावीत अल्प उत्पन्न गटा अंतर्गत गाळ्यांच्या नकाशात व आराखडयात फेरबदल करून जोडघरे ऐवजी बैठे चाळीतील गाळे [रो हौसिंग] व गाळ्यांचे भूखंड क्षेत्रफळ ६०.०० चौ.मी ऐवजी ४०.०० चौ.मी करून सुधारीत योजना तयार करण्यांत यावी. आराखडे नकाशे व अंदाजपत्रके तयार करावी व मागणी अंदाज आजमाविण्यासाठी प्रथम जाहिरात द्यावी व नंतरच पुढील कार्यवाही करावी.

विषय क्र. ३: गृहनिर्माण भवनाजवळील उच्च उत्पन्न गटा अंतर्गत गाळ्यांचे उर्वरीत काम पूर्ण करण्यासाठी प्राप्त निविदावर निर्णय घेणेबाबत.

.....

या विषयावर चर्चा करतांना उपसभापतींनी माहिती दिली की, १९ गाळे उच्च उत्पन्न गट गृहनिर्माण भवनाजवळील या योजनेच्या उर्वरीत कामासाठी प्राप्त झालेल्या निम्नतम दराची निविदा ही ३२% जादा होती. यावर चर्चा करतांना मंडळाच्या सदस्यांनी मत प्रदर्शित

केले की, निम्नतम दराची निविदा ही जास्त दराची वाटते. करिता निम्नतम दराचे निविदाधारक मे. अमित बिल्डर्स यांना मंडळासमोर वाटाघाटीस बोलविण्यांत आले व त्यांना सांगण्यांत आले की, आपण जी निम्नतम दराची निविदा दिलेली आहे ती जास्त आहे व त्या दरात काम देणे हे मंडळास परवडणारे नाही असे सभापतींनी सांगितले. म्हणून सदरचा दर कमी करावा असे मंडळातर्फे त्यांना सांगण्यांत आले.

यावर मे. अमीत बिल्डर्स यांनी सांगितले की, ते दिड टक्का दर कमी करण्यास तयार आहेत. यावर चर्चा करतांना मा. सभापतींनी सांगितले की, तरीही हा दर जास्त होतो. यावर आयुक्त म. न. पा. औरंगाबाद यांनी सांगितले की, जे काम राहिलेले आहे ते काम छोटेछोटे काम आहे. लाकुड काम व प्लॅस्टर ही कामे खार्चिक आहेत.

यावर आयुक्त महानगरपालिका यांनी सांगितले की, मे. अमित बिल्डर्स यांनी सदरचे काम ३२% जास्त दरा ऐवजी २८% जास्त दराने करावे.

या अनुषंगाने मे. अमीत बिल्डर्स यांचेतर्फे सांगण्यांत आले की, सदरचे उर्वरीत काम हे छोटेछोटे ऑटम आहेत व ते फार महाग आहेत व बाजारात बांधकाम साहित्याच्या किंमती वाढत आहेत व पुन्हा ९३-९४ ची जिल्हा दरसुची वाढणार आहे. त्यामुळे २८% दराने काम करणे शक्य होणार नाही.

मंडळाने चर्चेअंती मे. अमीत बिल्डर्स यांना सांगितले की, आपण सदरचे उर्वरीत काम हे २८. ५०% जास्त या दराने करण्यासंबंधी लेखीपत्र मंडळास सादर करावे.

मे. अमीत बिल्डर्स यांनी मंडळाच्या विनंतीनुसार निविदेतील किंमतीचे काम वाटाघाटीअंती २८. ५०% जास्त या दराने करण्यासंबंधी लेखीपत्र मंडळास सादर केले आहे.

या विषयावर साधक-बाधक चर्चा झाली. निम्नतम निविदा धारकाचा दर २८. ५०% जास्त हा दिलेला दर १९९१-९२ दरसुचीवर आधारीत आहे. त्यानंतर ९२-९३ ची जिल्हा दरसुची व ९३-९४ ची येणारी दरसुची याचा विचार केला असता व उर्वरीत काम विशिष्ट

स्वरूपाचे व खर्चीक आहे. त्यामध्ये लाकुड, प्लॅस्टर याचा अंतर्भाव आहे. त्याचा दर बाजारात डीएसआर पेक्षा जास्त आहे हे गृहीत धरून सदरचे काम २८.५०% जास्त या दराने द्यावे असे ठरले व खालील प्रमाणे ठराव पास करण्यांत आला.

ठराव क्र.५४१

---

निम्नतम ठेकेदार मे. अमीत बिल्डर्स यांना १६ गाळ्यांच्या उर्वरीत काम २८.५०% जास्त दराने, सदरचे काम हे फार दिवसापासून अपूर्ण अवस्थेत आहे व त्याची किंमत ही दिवसेंदिवस वाढत आहे हे लक्षात घेऊन देण्यास मंडळाने मान्यता दिली. व हा ठराव पुढील बैठकीत कायम करण्याची वाट न पाहता काम सुरू करण्याचे आदेश देण्यांत यावे.

विषय क्र.४: गेवराई जि. बीड येथील स.क्र.५३ [भाग] वरील अल्प उत्पन्न गटांतर्गत २२६ गाळे, मध्यम उत्पन्न गट-१ अंतर्गत ६८ गाळे व मध्यम उत्पन्न गट-२ अंतर्गत ४१ गाळ्यांच्या योजनेबाबत.

....

या विषयाची बाब टिप्पणी उपसभापतींनी मंडळास वाचुन दाखविली. गेवराई येथे ५० गाळे बांधण्याबाबतचा प्रस्ताव प्राधिकरणाकडे पाठविला होता. परंतु प्राधिकरणाने असे कळविले आहे की, जेवढे अर्ज प्राप्त झाले आहेत तेवढया नमुना घराचे बांधकाम हाती घेण्यांत यावे. बांधकाम चालु असतांना जनतेकडुन चौकशी होईल व पुन्हा अर्ज प्राप्त होण्याची शक्यता असल्यास दुसरी जाहिरात देण्यांत यावी व प्राप्त झालेल्या अर्जाप्रमाणे दुस-या भागामध्ये बांधकाम सुरु करण्यात यावे. अशा प्रकारे प्राधिकरणाचा निधी अडकुन राहणार नाही. कृपया प्राधिकरणाच्या निधी अमर्यादीत कालावधीपर्यन्त अडकुन ठेवणे टाळण्यांत यावे."

यावर चर्चा करतांना मा. सभापतींनी असे सांगितले की, गेवराई येथे ७ अर्ज प्राप्त झाले आहेत व प्राधिकरणाच्या उक्त पत्रानुसार ७ घरे गेवराई येथे बांधणे परवडणारे नाही. करिता प्राधिकरणाच्या

मार्गदर्शक तत्वानुसार ५० गाळ्यापेक्षा कमी घरे बांधता येणार नाहीत. मंडळाने ५० घरांची योजना राबविल्यास व बांधकामाला सुरूवात झाल्यास योजनेस चांगला प्रतिसाद येईल व लोकांमध्ये विश्वास निर्माण होईल.

मंडळाच्या सदस्यांनी असे मत प्रदर्शित केले की, गेवराई येथे ५० गाळ्यांची योजना राबवावी म्हणजे लोकांमध्ये विश्वास निर्माण होईल व योजनेस प्रतिसाद मिळेल.

या विषयावर चर्चा होऊन मंडळाने असा निर्णय घेतला की,

ठराव क्र. ५४२
------------

गेवराई येथे प्राधिकरणाच्या मार्गदर्शक तत्वानुसार ५० गाळ्यांची योजना कार्यान्वीत करावी.

विषय क्र. ५:- औरंगाबाद मंडळात जनसंपर्क अधिकारी या पदावर नेमणूक करण्याबाबत. . . . . .
श्री. प. अ. सत्वधार यांचा अर्ज.

ठराव क्र. ५४३
------------

या बाब टिप्पणीवर चर्चा होऊन मंडळाने असा निर्णय घेतला की, औरंगाबाद मंडळासाठी सहाय्यक जनसंपर्क अधिकारी हे पद मंजूर करावे म्हणून मंडळातर्फे प्राधिकरणास विनंती करावी.

विषय क्र. ६: मा.सभापतींच्या परवानगीने आयत्यावेळेस येणारे विषय.
--------------------------------

विषय क्र. १: मौजे म्हाळजा नांदेड येथील २१० गाळ्यापैकी १७१ शिल्लक गाळ्यांच्या वाटपाबाबत.
--------------------------------

या विषयाची बाब टिप्पणी मा. उपसभापतींनी मंडळास वाचून दाखविली. म्हाळजा नांदेड येथे विडी कामगारांसाठी २१० गाळ्यांची योजना राबविण्यात आली. परंतु विडी कामगारांकडून पुरेसा प्रतिसाद मिळाला नाही व गाळे [illegible] रिकामे पडून होते. त्यामुळे सदर गाळे हे सर्वसाधारण जनतेलाही वर्ग करण्यांत आले व प्रथम येईल त्यास प्रथम गाळा या तत्वावर

जाहिरात देण्यांत आली व गाळ्याचे वाटप चालु आहे. परंतु आतापर्यन्त सहा गाळे वाटप करण्यांत आले आहेत.

चिटणीस बिडी मजदुर संघ नांदेड यांनी दि. ७. २. ९४ च्या पत्रान्वये म्हाळजा नांदेड येथील शिल्लक गाळे परत बिडी कामगारांना देण्यांत यावे अशी विनंती केली आहे.

यावर विचार विनिमय होऊन मंडळाच्या सदस्यांनी असे मत प्रदर्शित केले की, चिटणीस बिडी मजदुर संघ यांना पत्र पाठवुन बिडी कामगारांना संघटीत करून व अर्ज भरून सर्व पुर्तता दिनांक ३१. ३. ९४ पर्यन्त करावी अशीही त्यांना कळविण्यांत यावे.

चर्चेअंती मंडळाने असा निर्णय घेतला की,

---

ठराव क्र. ५४४

म्हाळजा नांदेड येथील शिल्लक असलेल्या १७१ गाळ्यांची मागणी चिटणीस, बिडी मजदुर संघ नांदेड यांनी केलेली आहे. त्यानुसार त्यांना पत्र पाठवुन बिडी कामगारांना संघटीत करण्याचे व मंडळाचा विहित नमुन्यातील फॉर्म आवश्यक त्या कागदपत्रासह भरून मंडळाकडे ३१. ३. ९४ पुर्वी सादर करावे असे कळविण्यांत यावे.

विषय क्र. २: औरंगाबाद मुकुंदवाडी सर्वे क्र. ७ वर बांधण्यांत आलेल्या ८३ उच्च उत्पन्न गटाखालील घरांना बाह्य पाणीपुरवठा करणेबाबत.

.....

या विषयावर चर्चा करतांना आयुक्त महानगरपालिका औरंगाबाद यांनी मुकुंदवाडी येथील योजनेस पाणीपुरवठा महानगरपालिकेतर्फे करावयाचा आहे. त्यासाठी मंडळाने महानगरपालिकेस रू. ७, ५८, ००० भरावे म्हणजे मंडळाच्या योजनेस पाणीपुरवठा करता येईल.

यावर चर्चा करतांना उपसभापतींनी सांगितले की, मुकुंदवाडी येथे भविष्यात होणा-या योजनेसाठीही पाणीपुरवठा मिळणार आहे व महानगरपालिकेने कळविलेली रक्कम ही भरावयास हरकत नाही.

मंडळाच्या सदस्यांनी मत प्रदर्शित केले की, महानगरपालिकेने कळविलेली रक्कम महानगरपालिकेस भरण्यात यावी म्हणजे मंडळाचे गाळे त्वरीत वाटप करता येतील.

चर्चेअंती मंडळाने असा निर्णय घेतला की,

ठराव क्र. ५४४

---

महानगरपालिका औरंगाबादने, मुकुंदवाडी येथील मंडळाच्या वसाहतीस पाणीपुरवठा करण्यास्तव रु. ७,५८,०००/- कळविलेली रक्कम भरण्यास मंडळाने सर्वानुमते मंजूरी दिली.

पटलावरील विषय संपल्यानंतर उपस्थिताचे आभार मानून सभा संपली.

....